**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय**
पुणे महानगरपालिका
जा.क्र.: अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/२९९४
दिनांक ०५/०८/२०२०

**-: आदेश :-**

**विषय :-** एन.जी.टी.च्या मेट्रो प्रकल्पाच्या दाव्याबाबत पुणे महानगरपालिकेतर्फे सक्षम अधिकारी नेमणूकीबाबत.

**संदर्भ :-** १) मे. एन.जी.टी. ऑर्डर दि. ०७.०७.२०२०.

२) मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र. १/१८२, दि. २१/०७/२०२०.

पुणे शहरातील मेट्रो प्रकल्पाबाबत मेट्रो अलाईनमेंट व नदीपात्रातील फाऊंडेशन पिलर्सच्या कामामुळे नदीतील पूरवहन क्षमता घटल्याबाबत श्री. सारंग यादवडकर वि. पुणे महानगरपालिका व इतर हा दावा मे. हरित न्यायालय, दावा क्र. 28/2020 (WZ) दाखल करण्यात आला आहे. संभाजी उद्यानजवळील जे. एम. रोड लगत असणारी पूर्वीची मेट्रोची मार्गिका नदीपात्रातून वळविल्याने मेट्रो अलाईनमेंट व नदीपात्रातील फाऊंडेशन पिलर्सच्या कामामुळे नदीची पूरवहन क्षमता घटून मेट्रोच्या कामामुळे पुराचा धोका निर्माण झाला आहे, असा दावा करण्यात आला आहे.

सदर दाव्याच्या सुनावणीमध्ये दि.०७.०७.२०२० रोजी झालेल्या ऑर्डर मध्ये मे. एन.जी.टी.ने MPCB यांस समिती स्थापन करणेबाबत आदेश दिले आहेत. सदर ऑर्डर प्रमाणे समितीमध्ये खालील शासकीय संस्था असणार आहेत,

१) दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (DMRC)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB)

३) महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (MMRC)

४) पुणे महानगरपालिका (PMC)

सदर समितीमध्ये उपरोक्त शासकीय संस्था असल्याने पुणे महानगरपालिकेतर्फे प्रतिनिधी म्हणून संदर्भ क्र. २ चे ठरावास अनुसरून श्री. श्रीनिवास बोनाला, मुख्य अभियंता (प्रकल्प) यांची एन.जी.टी.च्या मेट्रो प्रकल्पाच्या दाव्याबाबत सक्षम अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

(रुबल अग्रवाल)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका

**प्रत -** मा.महापालिका आयुक्त,
मा. अतिरिक्त आयुक्त (वि) यांना माहितीस्तव.

**प्रती -** संबंधीत खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी, पुणे महानगरपालिका.